# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### कोल्हापूर महानगरपालिकेची हद्दवाढ करण्याबाबत

**(१) २८५ (२७-०१-२०१५). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर महानगरपालिकेची हद्दवाढ करण्याचा निर्णय शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०५-२०१६)** :(१), (२) व (३) कोल्हापूर महानगरपालिकेच्या हद्दवाढीबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

### इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथे पंचगंगा व कृष्णा नदीचे पाणी प्रदुषित झाल्यामुळे काळम्मावाडी धरणातून पाणीपुरवठा करण्याबाबत

**(२) १९८१ (२३-१२-२०१४). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथे पंचगंगा व कृष्णा नदीचे पाणी प्रदुषित झाल्यामुळे इचलकंरजी शहरात काळम्मावाडी धरणातून थेट पाईपलाईन योजना राबवून पाणीपुरवठा करण्याबाबतचा ठराव इचलकरंजी नगरपालिकेने माहे जानेवारी, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान संमत केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील योजनेचा विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करुन मंजुरीसाठी संचालक तथा आयुक्त नगरपरिषद संचालनालय यांना सादर केला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील प्रकल्प मंजुरी देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०४-२०१६)** :(१) इचलकरंजी शहरात काळम्मावाडी धरणातून थेट पाईपलाईन योजना राबवून पाणी पुरवठा करण्याबाबतचा ठराव माहे ऑगस्ट, २०१४ रोजी पारीत केला आहे, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदरचे प्रस्तावामध्ये असलेल्या त्रुटी इचलकरंजी नगरपरिषदेस कळविण्यात आल्या होत्या, तथापि, त्यांच्याकडून त्याची पुर्तता करण्यात आली नाही. तथापि तद्नंतर इचलकरंजी पाणीपुरवठा योजनेच्या उद्भवाबाबत सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची समिती नेमण्यात आली होती. सदर समितीने केलेल्या शिफारसीनुसार काळम्मावाडी उद्भवा ऐवजी वारणा नदी उद्भव किफायतशीर असल्याचा अहवाल प्राप्त झाला आहे. त्यानुसार वारणा धरण उद्भव विचारात घेऊन सविस्तर प्रकल्प अहवाल अमृत अभियानांतर्गत सादर करण्याच्या सूचना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मालेगांव (ता.जि.नाशिक) येथील मुख्य रस्ता आग्रा रोडवर उड्डाणपुल बांधण्याबाबत

**(३) ७५४७ (१०-०४-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव (ता.जि.नाशिक) येथील मुख्य रस्ता आग्रा रोडवर ९ शाळा व महाविद्यालये असुन ग्रामीण भागातून येणाऱ्या लोकांची वर्दळ सुध्दा याच रोडवर असल्याने या रोडवर मोठ्या प्रमाणात वारंवार अपघात घडत असल्याने सदर रस्त्यावर उड्डाण पुल व्हावा अशी मागणी बऱ्याच दिवसापासून नागरिकांकडून होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर रस्त्यावर उड्डाणपुल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०४-२०१६)** :(१) व (२) मालेगांव महानगरपालिकेने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत रु.४० कोटी रकमेचा उड्डाणपूल उभारणेचा प्रस्ताव दि.२९.०७.२०१३ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केला होता. संचालनालयाचे स्तरावर उड्डाणपूलाचे प्रस्तावाची छाननी केली असता त्यामध्ये असलेल्या त्रुटींची पूर्तता करण्यासाठी मालेगांव महानगरपालिकेस कळविण्यात आले आहे. तथापि, मालेगांव महानगरपालिकेने कळविण्यात आलेल्या त्रुटीची पूर्तता अद्यापावेतो केलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगर क्षेत्राच्या विकासासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्याबाबत**

**(४) ८८९९ (१०-०४-२०१५). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहराबरोबरच मुंबई महानगर क्षेत्राचा हाेत असलेल्या विकासासाठी पायाभूत सुविधा निर्माण करुन जागतिक आर्थिक केंद्र व व्यापारी केंद्र म्हणून मुंबई महानगराचा विकास करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,

(३) अद्याप प्रस्तावावर निर्णय घेतला नसल्यास त्याची कारणे काय आहेत व किती कालावधीत निर्णय होणे अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०४-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबइ्र यांच्या दिनांक ०३/१२/२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार मुंबईमध्ये आंतरराष्ट्रीय वित्तिय सेवा केंद्र (आयएफएससी) उभारण्यासाठी एक टास्क फोर्स गठीत केली आहे.

---

**सहारा येथील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टर्मिनल २ समोर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पुनस्थापित करण्याबाबत**

**(५) १४०३९ (०७-०४-२०१६). श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सहारा येथील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नव्या टर्मिनलच्या उभारणीचे काम करीत असतांना तेथे असलेल्या शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळा तात्पुरता हटविण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टर्मिनलचे उभारणीचे काम पूर्ण झाल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा पूर्ववत बसविण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०४-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुतळा बसविण्याचे काम हे मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रा.लि यांच्या मार्फत करण्यात आले असून त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार आंतरराष्ट्रीय विमानतळामधील टर्मिनलच्या उभारणीचे काम करत असताना तेथे असलेला छत्रपती शिवाजी महाराज यांच पुतळा हा सहार रोड लगत असलेल्या सुशोभिकरण केलेल्या भूखंडावर कायमस्वरुपी स्थलांतरीत करुन तेथे उभारण्यात आला आहे.

---

**वणी नगरपरिषद येथील नाटयगृहाचे बांधकाम अनेक वर्षापासून अर्धवट स्थितीत असल्याबाबत**

**(६) १५३१४ (०७-०४-२०१५). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणी नगरपरिषद येथील नाट्यगृह बांधकाम मागील २०-२५ वर्षापासून अर्धवट स्थितीत असून नाट्यगृहाचे बांधकाम कालबाह्य व जीर्णावस्थेत झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार नाट्यगृहाचे बांधकाम अर्धवट राहण्याची कारणे काय आहेत, सदर बांधकाम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) या प्रकरणी मुख्याधिकारी यांना प्रस्ताव पाठविण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील नियोजित मेट्रोमार्ग पुणे - मुंबई रस्त्यामार्गे जात असल्याबाबत**

**(७) १७६२१ (११-०८-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील नियोजित मेट्रोमार्ग पुणे - मुंबई रस्त्यामार्गे जात असल्याने शिवाजीनगर ते हिंजवडी या मार्गावर लाईट रेल ट्रान्झिट सिस्टिम (एलआरटी) सुरू करण्याच्या प्रस्तावावर शासन विचाराधीन असल्याचे दिनांक १८ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रस्तावावरील शासनाचा विचारविनियमय झाला आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची माहिती शासन विस्तृत करणार आहे काय, तसेच सदरील प्रकल्प केव्हा मार्गी लागणार आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०४-२०१६) :**(१), (२), (३) व (४) पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरणाने पुणे जिल्ह्यातील शिवाजीनगर ते हिंजवडी या मार्गावर मेट्रो रेल्वे प्रकल्पाचा तांत्रिक-आर्थिक सुसाध्यता अहवाल तयार करण्यासाठी दिल्ली मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, दिल्ली यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर सल्लागार पाच महिन्यात सविस्तर, प्रकल्प अहवाल पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरणास सादर करणे अपेक्षित आहे.

---

### लातूर जिल्ह्यातील रेणापूर ग्रामपंचायतीस नगर पंचायतीचा दर्जा देण्याबाबत

**(८) २१०५४ (१४-०८-२०१५). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील रेणापूर ग्रामपंचायतीस नगर पंचायतीचा दर्जा देण्याबाबत शासनाने अधिसूचना जाहीर करुनही तसेच शासनाच्या आदेशानुसार जिल्हाधिकारी लातूर यांनी उचित कार्यवाहीसाठी सदर प्रकरणी आपला अहवाल अवर सचिव ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय मुंबई यांच्याकडे दिनांक १७ एप्रिल, २०१५ रोजी पाठविलेला असतानाही अद्यापही रेणापूर ग्रामपंचायतीस नगर पंचायतीचा दर्जा देण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतलेला नाही ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाबाबत विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) सदर ग्रामपंचायतीस नगर पंचायतचा दर्जा देण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) सदर ग्रामपंचायतीस नगर पंचायतचा दर्जा देण्याबाबत शासनास किती कालावधी लागेल ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०५-२०१६) :**(१), (२), (३) व (४) लातूर जिल्ह्यातील रेणापूर ग्राम पंचायतीस नगर पंचायतीचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

### सूचक नाका कल्याण (पूर्व) (जि.ठाणे) येथील वाहतूक बेटाचे सुशोभीकरण करण्याबाबत

**(९) २१८०९ (१०-०८-२०१५). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सूचक नाका कल्याण (पूर्व) (जि.ठाणे) येथील वाहतूक बेट व यावरील सुशोभिकरणासाठी खर्च करुन देखील बेटाची बकाल अवस्था झाली असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार बेंटावरील सुशोभिकरणासाठी कोणती प्रशासनाकडून कोणती उपाययोजना करण्यात आली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०५-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सिंदेवाही (जि.चंद्रपूर) येथे नगरपरिषद निर्माण करण्याबाबत

**(१०) २३४०९ (१६-०९-२०१५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी नगरपंचायत / नगरपरिषद करण्याबाबत शासनाचे धोरणात्मक निर्णय आहे, या अनुषंगाने चंद्रपूर जिल्हयातील तालूका मुख्यालय असलेल्या सिंदेवाही येथे नगरपरिषद निर्माण करण्याबाबत शासनाने अद्यापही निर्णय घेतलेला नसल्याची बाब माहे दिनांक ४ जून, २०१५ रोजी वा त्या सुमारास निर्दशनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिंदेवाही येथे नगरपरिषद निर्माण करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी माहे मार्च २०१५, एप्रिल २०१५, मे २०१५, जून २०१५ च्या सुमारास मा.मुख्यमंत्री, प्रधान सचिव, नगरविकास मंत्रालय, मुंबई यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सिंदेवाही येथे नगरपरिषद निर्माण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करणार आहे,
(४) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०६-२०१६) :**(१),(२) व (३) उपरोक्त प्रकरणी सिंदेवाही जि.चंद्रपूर येथे नगरपंचायत स्थापन करण्याबाबत अधिसूचना दिनांक २५.०१.२०१६ रोजी राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भद्रावती (जि.चंद्रपूर) येथे नगरपरिषदेच्या जागेवर राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुर्णाकृती पुतळा उभारण्याबाबत

**(११) २४७२८ (११-०८-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भद्रावती (जि.चंद्रपूर) येथे नगरपरिषदेच्या जागेवर राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुर्णाकृती पुतळा उभारण्यासंदर्भात शासनाच्या मान्यतेसाठी अप्पर मुख्य सचिव (सा.प्र.वि.), मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १७ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास पत्र देण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०६-२०१६) :**(१) व (२) उपरोक्त प्रकरणी दिनांक २६/११/२०१५ च्या पत्रान्वये शासनाची मान्यता देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जळगांव शहरातील शिवाजीनगर आणि पिंप्राळा गेटजवळील रेल्वे उड्डाणपुलाबाबत

**(१२) २५२७३ (११-०८-२०१५). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव शहरातील शिवाजीनगर आणि पिंप्राळा गेटजवळील रेल्वे उड्डाणपुलाला अनेक दिवसापासून मान्यता मिळाली मात्र, महानगरपालिकेकडे निधी उपलबध नसल्याने उड्डाणपुलाचे काम अजुनही अपूर्णच आहे, हे खरे आहे काय,

(२) त्यामुळे सदर पुलावरील अवजड वाहतुक बंद करण्यास अनेक अडचणी होत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुलाच्या कामाकरिता निधी उपलब्ध होणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०५-२०१६) :**(१) होय.

जळगाव महानगरपालिकेची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट असल्याने रेल्वे विभागाने सूचित केल्यानुसार आवश्यक रकमेचा भरणा महानगरपालिकेस करता आलेला नाही.

(२) होय.

रेल्वे विभागाच्या सूचनांनुसार शिवाजीनगर पुलावरील अवजड वाहतुकीस प्रतिबंध करण्यासाठी महानगरपालिकेकडून उपाययोजनांची कामे पूर्ण केलेली असून पुलावरील अवजड वाहतुक बंद करण्यात आलेली आहे.

(३) सदर रेल्वे पुलांच्या कामाकरीता निधी उभारणे महानगरपालिकेस शक्य होत नसल्याने, सदर कामे रेल्वे विभागामार्फत करुन घेण्यासाठी केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध करुन घेणेबाबत महानगरपालिकेकडून संसद सदस्यांना विनंती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दर्यापूर (जि.अमरावती) अंजनगाव सुर्जी येथील नगरपालिकेच्या बांधकाम विभागात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१३) २६०४२ (१०-०८-२०१५). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दर्यापूर (जि.अमरावती) मतदारसंघातील अंजनगाव सुर्जी येथील नगरपालिकेच्या बांधकाम विभागात निविदा न काढता रस्त्यावर २० लक्ष रु. चा मूरुमाचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गैरव्यवहाराची चौकशी केली काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०६-२०१६) :**(१) व (२) अंजनगाव सुर्जी नगरपारिषदेने सन २०१५-१६ मध्ये पावसाळ्याच्या दिवसात रस्त्यावर मुरुम टाकण्याकरिता निविदा काढलेली होती. ही निविदा साप्ताहिक ग्राम वैभव या वृत्तपत्रात प्रकाशित केली होती. त्यामुळे निविदा न काढता रस्त्यावर २० लक्ष रुपयाचा मुरुम टाकला हे खरे नाही. त्यामुळे याबाबत चौकशी करण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही

---

**दर्यापूर (अमरावती) येथील अंजनगाव सुर्जी नगरपालिकेने**
**शहानुर नदीला पुलाची उंची वाढविणेबाबत**

**(१४) २६०४५ (१६-०९-२०१५). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दर्यापूर (अमरावती) मतदार संघातील अंजनगाव सुर्जी नगरपालिकेने शहानुर नदीला जास्त पाणी आल्यास पुलाची उंची वाढविणे आवश्यक होती, परंतु १३ व्या वित्त आयोगातून रुपये १८ लक्ष खर्चुन रुंदी वाढवून शासकीय पैशाच्या अपव्यय केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०६-२०१६) :**(१) व (२) अंजनगांव सुर्जी नगरपरिषदेने पुलाची रुंदी वाढविण्याकरिता १३ व्या वित्त आयोगाच्या निधीतून काम केलेले आहे. कामासाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबी जसे अंदाजपत्रक, ठराव इत्यादी बाबींमध्ये रुंदीचाच उल्लेख केलेला होता. पारित केलेला ठराव व मंजूर अंदाजपत्रकानुसार काम करण्यात आले आहे. त्यामुळे याबाबत चौकशी करण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वर्धा शहरालगतच्या हद्दपार परिसराचा स्थानिक स्वराज्य संस्थेत समावेश करण्याबाबत**

**(१५) २६०६१ (११-०८-२०१५). डॉ.पंकज भोयर (वर्धा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा शहरातील वार्ड क्र.१ व २ मधील इंदिरानगर झोपडपट्टीचा भाग वार्ड क्र.४ मधील स्नेहलनगर वस्तीला लागून असलेला भाग व वार्ड क्र.२१ मधील तुकाराम वार्डाला लागून असलेला भाग हे तिन्ही भाग मागील १२ वर्षापासून वर्धा नगरपरिषद किंवा ग्रामपंचायत यापैकी कुठल्याही स्थानिक स्वराज्य संस्थेत समाविष्ट नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे या भागात विकासाची कामे रोड, नाल्या, पाणी पुरवठा, विद्युत व्यवस्था, संडास सुविधा व सफाई सुविधा यासारख्या मुलभूत सुविधेपासून येथील नागरीक वंचित आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बाब स्थानिक लोकप्रतिनिधींमार्फत स्थानिक प्रशासन व शासनास वारंवार निवेदनाद्वारे मागणी करून देखील त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर परिसराला स्थानिक स्वराज्य संस्थेत समावून घेण्याकरीता शासन कार्यवाही करणार आहे काय,
(५) असल्यास, त्याचे स्वरूप व किती कालावधी अपेक्षित आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०६-२०१६) :**(१), (२), (३), (४) व (५) जिल्हा परिषद, वर्धा तर्फे संबंधित भाग ग्रामपंचायतीमध्ये जिल्हा परिषद कार्यालय पत्र क्र.२०३३/१५, दिनांक ०५/१२/२०१५ अन्वये इंदिरा नगर व आदिवासी कॉलनी येथील मालमत्ता धारक ग्रामपंचायत नालवाडी मध्ये रामनगर मधील मालमत्ता धारक ग्रामपंचायत चितोडा (चिचाळा) मध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथील सिहस्थ कुंभमेळा पहिल्या शाही पर्वणीमध्ये सुरक्षेच्या अतिरेकामुळे पर्यटक, भाविक व स्थानिक नागरिकांचे प्रचंड हाल झाल्याबाबत**

**(१६) २८५५४ (२१-०१-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील दि.२९ ऑगस्ट २०१५ रोजीच्या सिंहस्थ कुंभमेळा पहिल्या शाही पर्वणीमध्ये सुरक्षेच्या अतिरेकामुळे व प्रशासकीय अनास्थेमुळे पर्यटक, भाविक व स्थानिक नागरिकांचे प्रचंड हाल झाल्याबाबत लोकप्रतिनिधी व विविध सामाजिक संघटनांनी तक्रारी केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, अनावश्यक बांबू बॅरेकेटिंग आणि तात्पुरत्या शौचालयांबाबतच्या अनावश्यक खर्चाची चौकशी करण्यासाठी शासनाकडे तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत, हेही खरे आहे काय,
(३)असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
(४)असल्यास, चौकशीत काय आढळून आले व चौकशी अहवालाचा निष्कर्षानुसार संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०४-२०१६) :**(१) अशा आशयाच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

- मा.लोकप्रतिनिधी यांनी पहिल्या पर्वणीच्या काळात केलेल्या नियोजनासंदर्भात लेखी पत्र देऊन नियोजनात बदल सुचविले होते. त्यानुसार स्थानिक लोकप्रतिनिधींची बैठक घेऊन त्यांच्या सुचनांनुसार नियोजनात अंशत: बदल करण्यात आला होता.

- नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पहिल्या पर्वणीमध्ये भाविक, पर्यटक आणि स्थानिक नागरिकांचे कोणत्याही प्रकारचे हाल झालेले नसून कोणतीही अप्रिय घटना न घडता पर्वणी सुरळीत पार पडली आहे.

(२) सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पर्वणीच्या काळात भाविकाच्या सुरक्षा व सोयीच्या दृष्टीकोनातून आवश्यक त्या ठिकाणी बांबू बॅरेकेटिंग करणे आवश्यक होते.

तसेच पर्वणी कालावधीत भाविकांसाठी तात्पुरती शौचालये उभारणे आवश्यक होते. यासाठी नाशिक महानगरपालिकेने विहित निविदा प्रक्रिया राबवून, तात्पुरती शौचालये उभारली होती.

बांबू बॅरेकेटिंग आणि तात्पुरत्या शौचालयांबाबत अनावश्यक खर्च झाल्यासंदर्भात पोलीस आयुक्त, नाशिक व नाशिक महानगरपालिका यांच्याकडे तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तिरोडा शहरातील पाणी पुरवठा योजना

**(१७) २९१३५ (२१-०१-२०१६). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिरोडा शहरातील पाणी पुरवठा योजनेतंर्गत सिमेंट पाईप लाईन असून ४० वर्ष जुनी आहे व ती अनेक ठिकाणी खंडीत झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे नागरीकांना सुरळीत पाणी पुरवठा होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तिरोडा शहरातील पाणी पुरवठा योजनेतंर्गत पाणी पुरवठा सुरळीत होण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०४-२०१६)** :(१) तिरोडा शहर पाणीपुरवठा योजनेअंतर्गत सिमेंट पाईपलाईन ३१ वर्ष जुनी झालेली आहे व ती खंडीत झालेली होती, तथापि, सदर गळत्या वेळोवेळी दुरुस्त करण्यात येतात.

(२) सद्यस्थितीत तिरोडा शहरातील नागरीकांना सुरळीत पाणी पुरवठा होत आहे.

(३) व (४) तिरोडा शहरातील पाणी पुरवठा योजना ३१ वर्ष जुनी झाल्यामुळे नवीन योजना प्रस्तावित करण्याचे तिरोडा नगरपरिषदेचे नियोजन आहे.

---

## खामगाव (जि.बुलढाणा) येथील गणेशमूर्ती विटंबना प्रकरणी मुख्याधिकारी यांचेवर तात्काळ कारवाई करणेबाबत

**(१८) २९१६० (२१-०१-२०१६). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव नगरपरिषदेच्या वतीने गणेश विसर्जन मिरवणुकी दरम्यान फिरत्या जलकुंडाची व्यवस्था नगरपरिषदेमार्फत करण्यात आली, त्यात गणेशमूर्ती विसर्जित करण्याचे आवाहन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पर्यावरण पूरक उपक्रमाच्या नावाखाली पालिकेने राबविलेल्या फिरत्या जलकुंडाची उपक्रमात नागरिकांनी विसर्जित केलेल्या मुर्त्या पालिकेच्या वाहनांनी चक्क ग्राउंडवर (कचऱ्याची विल्हेवाट लावल्याची जागेवर) टाकून दिल्या, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकार हा धार्मिक भावना भडकवणारा असून या प्रकरणी नगराध्यक्ष व मुखाध्याकारी यांचेवर तत्काळ कारवाई करण्याबाबत तक्रार संबंधीत पोलीस ठाण्यात दाखल झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची जबाबदारी मुखाध्याकारी, नगरपरिषद खामगाव यांचेवर निश्चित करून त्यांचेवर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतीनिधी वि.प.स यांनी मा.नगरविकास राज्यमंत्री महोदयाकडे दि.०५/१०/२०१५ रोजीच्या पत्रानुसार कारवाई करण्याची मागणी केली आहे, हेही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०५-२०१६) :**(१), (२), (३), (४) व (५) या प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तसेच संबंधित पोलीस ठाण्यात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी बुलढाणा यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार जिल्हाधिकारी,बुलढाणा यांचेकडून प्राप्त प्रस्तावानुसार श्री.धोंडींबा इरबा नामवाड, तत्कालीन मुख्याधिकारी, नगर परिषद खामगांव यांना दिनांक १६/०२/२०१६ च्या शासन आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बदलापूर पूर्व (जि.ठाणे) ते पनवेल रस्ता पूर्ण करण्याबाबत**

**(१९) २९१९९ (०५-०२-२०१६). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.सुरुपसिंग नाईक (नवापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर ते पनवेल रस्त्याचे काम अर्धवट अवस्थेत असल्याचे माहे सप्टेंबर २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे काय,

(२) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) तसेच सदर रस्त्याचे काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०४-२०१६) :**(१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रामटेक (जि.नागपूर) तालुकयातील नगरधन येथील सूर्यलक्ष्मी कॉटन मिल्समध्ये केमिकल्स वेस्ट टँक स्वच्छ करताना ३ कामगार बेशुध्द होऊन टाक्यात पडल्याबाबत**

**(२०) २९४५१ (०३-०५-२०१६). श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक (जि.नागपूर) तालुकयातील नगरधन येथील सूर्यलक्ष्मी कॉटन मिल्समध्ये केमिकल्स वेस्ट टँक स्वच्छ करताना ३ कामगार बेशुध्द होऊन टाक्यात पडले असल्याचे दिनांक २३ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामगारांना संरक्षण देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करणार येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०६-०५-२०१६) :**(१) होय. हे खरे आहे.

दिनांक २०.०८.२०१५ रोजी सूर्यलक्ष्मी मिल्स लिमिटेड (व्हिलेज नगरधन), ता.रामटेक, जिल्हा नागपूर या कारखान्यातील Effluent Treatment Plant (ETP) मधील परमिट वॉटर टँक स्वच्छ करण्यासाठी तीन कामगार टँकमध्ये उतरले असता तिनही कामगार बेशुध्द झाले. कोणासही अपंगत्व आलेले नाही.

(२) व्यवस्थापनाने सदर कामगारांचा संपूर्ण वैद्यकीय खर्च केलेला असून अनुपस्थितीच्या काळातील संपूर्ण वेतनही दिलेले आहे.

सदर कारखान्याच्या व्यवस्थापनाने बंदिस्त जागा (Confined Space)असलेल्या टँकमध्ये कामगारांना उतरविताना योग्य ब्रिदींग ॲपरेटस व दोरखंड बांधलेला सेफ्टी बेल्ट न पुरविल्यामुळे कारखाने अधिनियम, १९४८ अंतर्गत कलम ३६ (२) (b) च्या भंगाबाबत कारखान्याचे भागवटादार, तसेच सदर घटनेची माहिती कारखाना व्यवस्थापनाने विहीत वेळेत व विहीत नमुन्यामध्ये कार्यालयात सादर न केल्यामुळे महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ अंतर्गत नियम ११५ (१) व (२) च्या भंगाबाबत कारखान्याचे व्यवस्थापक यांचेविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

अशा प्रकारच्या कामामध्ये सुरक्षा साधने उपलब्ध करुन देऊन कामगारांना त्यांच्या वापराबाबत, तसेच या कामामध्ये घ्यावयाच्या काळजीबाबत प्रशिक्षण देण्याच्या सूचना व्यवस्थापनास दिलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पीय खर्चाचे गत**
**३ वर्षापासून लेखापरिक्षण झाले नसल्याबाबत**

**(२१) २९९५९ (२१-०१-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पीय खर्चाचे गत ३ वर्षापासून लेखापरिक्षण झाले नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महानगरपालिकेतर्फे दर वर्षी हजारो कोटींचा अर्थसंकल्प सादर केला जात असून सन २०१५-१६ चा सुमारे ४ हजार कोटींचा अर्थसंकल्प सादर केला दर वर्षीचा अर्थसंकल्प सुमारे एक चतुर्थाश म्हणजे ८०० ते १००० कोटीनी फुगविला जातो े त्यामुळे महानगरपालिकेच्या जमा खर्चातील तूट वाढत चालली आहे परंतु असे असूनही या अर्थसंकल्पाचे गत ३ वर्षापासून लेखापरिक्षण झाले नसल्याचे माहिती अधिकारात स्पष्ट झाले आहे हे पाहता शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०६-२०१६) :**(१) सन २०१२-१३ अखरे पर्यंत लेखापरिक्षण (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १०६ नुसार) पूर्ण झाले आहे. सन २०१३-१४ चे लेखापरिक्षण प्रगतीत आहे. तसेच कलम १०७ अे नुसार सन २०१२-१३ अखेर पर्यतचे लोकल फंड व ए.जी.ऑडिट झालेले आहे.

(२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये नमूद करण्यात आलेल्या तरतुदीनुसार करांच्या दरांमध्ये यथायोग्य वाढ सुचवून सदर अधिनियमातील कलम ९५ नुसार जमा खर्चाचा आराखडा स्थायी समितीपुढे सादर करण्यात येतो. तद्ननंतर कलम ९६ नुसार स्थायी समिती फेरफाराशिवाय किंवा फेरफारासह मुख्य सभेच्या मान्यतेसाठी ठराव करते व कलम १०० मधील तरतुदीनुसार महानगरपालिका सभा यांच्या स्तरावरुन जमा खर्च व अंतर्गत प्रस्तावित तरतुदी यामध्ये फेरफार होऊन अंदाजपत्रकास अंतिम मान्यता दिली जाते. अर्थंसंकल्पिय जमा खर्च आणि प्रत्यक्ष जमा खर्च ही दोन पृथक स्वरुपाची कामे आहेत. अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार जमेचा अंदाज म्हणजे प्रत्यक्ष जमा होणारी रक्कम नसते. प्रत्येक वित्तीय वर्षामध्ये जमा व खर्चाचा ताळमेळ घेऊन योग्य ती कार्यवाही केली जाते. सद्या सन २०१३-१४ चे लेखापरिक्षण प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवतनाही.

---

## मालेगाव येथील महानगरपालिका हद्दीतील नवीन बसस्थानक किडवाई रस्ता व रजारोड येथील जकात नाके खासगी मालकांना बेकायदा देण्यात आल्याबाबत

**(२२) ३००९८ (२१-०१-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव येथील महानगरपालिका हद्दीत जकात बंद होऊन स्थानिक सेवा कर लावण्यात आल्याने महानगरपालिकेच्या मालकीचे जकात नाके बंद पडले आहे. यातील नवीन बसस्थानक किडवाई रस्ता व रजारोड येथील जकात नाके खासगी मालकांना बेकायदा देण्याबरोबरच पदाचा दुरुपयोग केल्याचा संबंधित अधिकाऱ्यांवर आरोप ठेवण्यात आला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित मालकांना नाके खाली करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने चौकशी करुन त्यांच्यावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०४-२०१६) :**(१) हे खरे आहे.

याबाबत महानगरपालिकेचे मुख्यलेखापरीक्षक यांचेमार्फत प्राथमिक चौकशी करण्यात आली असता प्रथमदर्शनी गाळे वाटप करतांना अनियमितता झाल्याचे दिसून आले.

(२) संबंधित गाळेधारकांना गाळे रिकामे करण्याबाबत महानगरपालिकेमार्फत नोटीस बजावण्यात आलेली आहे. सदर नोटीशीविरुध्द गाळेधारकांनी स्थानिक न्यायालयात दावा दाखल केला असून मा.न्यायालयाने स्थगिती आदेश पारित केलेला आहे.

सदर गाळे वाटपाबाबत झालेल्या अनियमिततेप्रकरणी महानगरपालिकेच्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची विभागीय चौकशी महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

तसेच संबंधित उपायुक्त यांच्याविरुध्द विभागीय चौकशी करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबईत कबड्डी खेळासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्टेडियम बांधणेबाबत

**(२३) ३०३१३ (२१-०१-२०१६). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईत आंतरराष्ट्रीय स्तरावरील कबड्डी सामने खेळण्यासाठी स्टेडीयम बांधण्यासाठी सिडकोने भूखंड उपलब्ध करुन दयावा म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींनी व्यवस्थापकीय संचालक सिडको यांना माहे ऑगस्ट किंवा सप्टेंबर, २०१५ मध्ये निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०५-२०१६) :**(१) होय.

(२) सिडकोकडून क्रीडा उपक्रमाकरीता भूखडा उपलब्धतेबाबत परिक्षण करण्यात येत असून क्रिडा उपक्रमाकरीता निर्देशीत केलेले भूखंड वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन पात्र संस्थांस वाटप करण्याकरीता ऑनलाईन योजना पुस्तिका तयार करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई (जि.ठाणे) येथील महापालिकेच्या आरोग्य विभागाने काळ्या यादीतील कंपनीला पॅथॉलॉजी साहित्य खरेदीच्या ठेका देण्यात आल्याबाबत**

**(२४) ३०३८९ (२१-०१-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई (जि.ठाणे) येथील महापालिकेच्या आरोग्य विभागाला विविध साथीच्या आजारांना आळा घालण्यास अपयश येवूनही त्यांच्या काळ्या यादीतील कंपनीला पॅथॉलॉजी साहित्य खरेदीच्या ठेका देण्यात आल्याचा गंभीर प्रकार माहे ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार काळ्या यादीत असलेल्या कंपनीला ठेका देणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच विविध साथीच्या आजारांना आळा घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०५-२०१६) :**(१), (२) व (३) नवी मुंबई महानगरपालिकेचया आरोग्य विभागासाठी पॅथॉलॉजी साहित्य खरेदीच्या निविदेकरीता मे.एस्के सर्जिकल या अभिकरणाने सन २०१३-१४ या वर्षात दोन पॅथॉलॉजी साहित्यांसाठी बाजार भावापेक्षा जास्त दर दर्शविल्याने या अभिकरणास नवी मुंबई महानगरपालिकेच्या निविदेमध्ये सहभाग घेण्यास महानगरपालिकेकडून ३ वर्षाकरीता प्रतिबंध करण्यात आला होता.

मात्र तद्नंतर संबंधित अभिकरणाने महानगरपालिकेस सादर केलेल्या खुलाशात ही चुक हेतूपुरस्सर झालेली नसून टंकलेखन आणि कारकूनी चुकीमुळे झाल्याचे नमूद केले. या अभिकरणाने संपूर्ण निविदा कालावधीत उक्त दोनही पॅथॉलॉजी साहित्य नवी मुंबई महानगरपालिकेस विनाशुल्क पुरविले आहे. त्यामुळे यामध्ये महागनरपालिकेचे नुकसान झाले नसल्याचे आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी कळविले आहे.

वरील पार्श्वभूमीवर नवी मुंबई महानगरपालिका निविदा उघड समिती, मुख्य लेखा परिक्षक व कनिष्ठ विधी अधिकारी यांनी केलेल्या शिफारशीनुसार आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी सदर अभिकरणास प्रतिबंधित करण्याचे आदेश मागे घेतले असून सद्य:स्थितीत या अभिकरणाचा काळ्या यादीत समावेश नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबईत स्थानिक प्रकल्पग्रस्त तरुणांना रोजगार उपलब्ध होण्याकरिता कौशल्य प्रशिक्षण प्रकल्प सुरु करण्याबाबत**

**(२५) ३०३९५ (२१-०१-२०१६). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईत स्थानिक प्रकल्पग्रस्त तरुणांना रोजगार उपलब्ध व्हावा आणि कुशल मनुष्यबळ निर्माण व्हावे यासाठी प्रकल्पग्रस्त कौशल्य प्रशिक्षण प्रकल्प सुरु करण्याचा निर्णय सिडकोने घेतला असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खर आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पासाठी सिडको भूखंड उपलब्ध करुन देणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचा प्रकल्प लवकरात लवकर कार्यान्वित करण्यासाठी कार्यवाही करण्यात आली वा येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०५-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) प्रकल्पग्रस्त कौशल्य प्रशिक्षण प्रकल्पासाठी भूखंड उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही. तथापि, प्रकल्पबाधितांच्या पाल्यांना आवडीनुसार आणि क्षमतेनुसार उपलब्ध असलेल्या विविधि रोजगाराच्या संधीची माहिती मिळावी या उद्देशाने सिडकोतर्फे खास कौशल्याविकास कार्यक्रमाचे आयोजन बेलापूर रेल्वे स्टेशन कॉम्लेक्स टॉवर क्र.५ मध्ये प्लॅटफॉर्म लेव्हल येथे स्वत:च्या जागेत सुरु करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवी मुंबईतील तुर्भे व सानपाडा रेल्वे स्टेशनच्या मध्ये असलेल्या प्रसिध्द जनता मार्केटकडे जाण्यासाठी स्कायवॉक बांधण्याबाबत**

**(२६) ३०४०६ (२१-०१-२०१६). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील तुर्भे व सानपाडा रेल्वे स्टेशनच्या मध्ये असलेल्या प्रसिध्द जनता मार्केटकडे जाण्यासाठी रेल्वे प्रवाशी, रहिवाशी, कॉलेजचे विद्यार्थी या सर्वांना रेल्वे रुळ ओलांडावा लागतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जीव धोक्यात घालून दररोज हजारो व्यक्ती रेल्वे रुळ ओलांडून जात असल्यामुळे अपघात टाळण्यासाठी त्या ठिकाणी स्कायवॉक बांधण्याची बाब सिडकोच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्कायवाक बांधण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) अद्यापी, कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०५-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) सदर ठिकाण हे नवी मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीत येत असून त्या ठिकाणी रेल्वे विभागाकडून deposit term basis वर पादचारी पुल (Foot Over Bridge) बांधणे प्रस्तावित आहे.
(३) व (४) सदर पादचारी पुल बांधण्यासाठी रेल्वे विभागास रु. ६,७४,६७,४५५/- एवढी रक्कम अदा करण्यास नवी मुंबई महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने मान्यता दिली आहे.
उक्त रक्कम अदा करण्यापूर्वी रेल्वे विभागाशी करारनामा करण्याची कार्यवाही नवी मुंबई महानगरपालिकेकडून करण्यात येत असल्याचे आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी कळविले आहे.

---

## पुणे शहरातील झोपडपट्यांमध्ये वैयक्तीक शौचालये उभारण्याबाबत

**(२७) ३०५१२ (२३-१२-२०१५). अॅड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथे करण्यात आलेल्या शासकीय सर्वेक्षणात सुमारे ९२ हजार घरांमध्ये वैयक्तिक स्वच्छतागृह नसल्याची बाब समोर आली आहे तर अद्यापही शहरातील ६९ झोपडपट्यांमध्ये २२० ठिकाणी नागरिक उघड्यावरच शौचास जात असून धनकवडी क्षेत्रिय कार्यालयाच्या क्षेत्रात ही संख्या सर्वाधिक असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथे वैयक्तिक शौचालये उभारण्याबाबत नागरिकांना सूचना देण्याबरोबरच येथील झोपडपट्यांमध्ये शौचालये उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) शहरांमधील ज्या कुटुंबांकडे शौचालयाची सुविधा उपलब्ध नसल्याने उघड्यावर शौचास जात आहेत अशा कुटुंबांना वैयक्तीक अथवा सामुदायीक शौचालयाची सुविधा स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत उपलब्ध करुन देण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महापालिकेच्या कर्मचा-यांच्या वेतनास रक्कम कमी पडू नये म्हणून निधी देण्याबाबत**

**(२८) ३०६२२ (२२-०१-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात पन्नास कोटीची वार्षिक उलाढाल असणा-या सर्व व्यापा-यांना दिनांक १ ऑगस्ट, २०१५ रोजीपासून सवलत दिल्याने कोल्हापूर महापालिकेचे आर्थिक उत्पन्न कमी झाल्याने कर्मचाऱ्यांच्या वेतनास रक्कम कमी पडत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद् नुसार महापालिकेच्या कर्मचा-यांच्या वेतनास रक्कम कमी पडू नये म्हणून निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) दिनांक १ ऑगस्ट, २०१५ पासून शासनाने रु. ५० कोटी पेक्षा कमी उलाढाल असलेल्या व्यापाऱ्याकडून स्थानिक संस्था कर वसूली पूर्णताहा बंद केली आहे.

- यामुळे महानगपालिकांच्या उत्पन्नामध्ये येणारी तूट भरुन काढण्यासाठी शासनाकडून सहायक अनुदान देण्यात येत आहे.
- सहायक अनुदानाची परिगणना करताना महानगरपालिकेचे मागील ५ वर्षातील जकातीचे अथवा स्थानिक संस्था करापासूनचे सर्वोच्च उत्पन्न आधारभूत मानून त्यावरती ८% वाढ विचारात घेऊन सन २०१५-१६ साठी प्रत्येक महानगपालिकेस देय होणारे अनुदान निश्चित केले आहे. त्यामुळे महानगपालिकांना जाकतीच्या व स्थानिक संस्था कराच्या तुलनेत आता जास्त उत्पन्न प्राप्त होत आहे.
- महानगपालिकांचे कोणतेही आर्थिक नुकसान होणार नाही अशा रितीने शासनाने उपाययोजना केलेली असल्याने महानगरपालिकांच्या आर्थिक स्थैर्यावर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही याचा शासनाने पुरेपुर दक्षता घेतली आहे.

(३) कोल्हापूर महानगपालिकेस मागील ५ वर्षात जकात / LBT पासून प्राप्त झालेल्या उत्पन्न तसेच सन २०१५ मध्ये प्राप्त झालेले उत्पन्न याचा एकत्रित तपशील खालील प्रमाणे आहे.

| २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|
| ९९.२६ | ६८.०१ | ८३.४३ | ९४.६१ | १००.०२ | १०२.१८ |

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईतील वडाळा ते संत गाडगे महाराज चौक दरम्यान मोनो रेल्वेबाबत

**(२९) ३०७१६ (२१-०१-२०१६). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वडाळा ते संत गाडगे महाराज चौक दरम्यान मोनो रेल्वेचे दुस-या टप्पयाचे बांधकाम करीरोड स्टेशनावर लोंखडी पुल टाकण्याचे निर्णायक काम मध्ये रेल्वेचा मेगा ब्लॉक न मिळाल्याने लांबणीवर पडले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम निर्धारित वेळेत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०४-२०१६) :**(१), (२) व (३) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या मोनोरेल प्रकल्पाचा टप्पा-२ (वडाळा ते संत गाडगे महाराज चौक) येथील बांधकाम अंतिम टप्प्यात आहे.

सदर मार्गिका करी रोड येथे रेल्वे ओलांडत असल्याने रेल्वेकडून मेगाब्लॉक मिळवून दिनांक ०५ सप्टेंबर, २०१५ रोजी मध्यरात्री ट्रस सरकवण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

---

### उरण जि.रायगड येथील प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के जमिनी वाटपाचे प्रमाणपत्र देण्याबाबत

**(३०) ३०८८३ (१६-०१-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) येथील प्रकल्पग्रस्तांना सन २०१४ मध्ये मा.पंतप्रधान यांच्या हस्ते साडेबारा टक्के जमिनी वाटपाचे पात्र शेतकऱ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्व प्रकल्पग्रस्तांना अद्याप साडेबारा टक्के जमिनीचे वाटप झालेले नाही, तसेच ज्यांना प्रमाणपत्रे देण्यात आलेली आहे त्यांनाही जमिनीचा ताबा मिळालेला नाही हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विषयाबाबत तेथील प्रकल्पग्रस्त नागरिकांकडून अनेक आंदोलने होत आहेत तसेच जेएनपीटी चौथ्या बंदराच्या उद्घाटनाच्या वेळ मा. पंतप्रधानाच्या समोर तेथील नागरिकांनी मोर्चा काढून निदर्शने केली होती हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रकल्पग्रस्तांना देण्यात येणाऱ्या साडेबारा टक्क्यांच्या जमिनी व प्रमाणपत्रे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०५-२०१६) :**(१), (२) व (३) होय.

(४) जे.एन.पी.टी. प्रकल्पासाठी सिडकोने हस्तांतरीत केलेल्या जमिनीच्या भूधारकांना १२.५ टक्के जमीन वाटप योजनेचा लाभ देण्याबाबतचा शासन निर्णय दि.१४.८.२०१४ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. उक्त शासन निर्णयातील तरतूदीनुसार जिल्हाधिकारी, रायगड यांनी जे.एन.पी.टी. प्रकल्पासाठी संपादीत करण्यात आलेल्या १२ गावांच्या पात्र खातेदारांची यादी मुख्य व्यवस्थापक, जे.एन.पी.टी. यांना सादर केली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे. जे.एन.पी.टी.ने यासाठी जमीन उपलब्ध करुन दिल्यास सिडकोकडून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भांडुप (पश्चिम) भागात असलेल्या टेकड्यांवर असलेली**
**झोपडपट्ट्यांची वस्ती संरक्षण भिंती बांधकामाबाबत**

**(३१) ३१०४७ (२१-०१-२०१६). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडुप (पश्चिम) भागात असलेल्या टेकड्यांवर असलेली झोपडपट्ट्यांची वस्ती या टेकड्यांचे भूस्संखलन दिवसेंदिवस होत असल्याने टेकड्यावरील घरांची पडझड होऊ जनजीवन विस्कळीत होते म्हणून शासनाकडून दरवर्षी मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाला डीपीडीसी मार्फत ४ ते ५ कोटी रुपयांचा निधी संरक्षण भिंती बांधण्यासाठी दिला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संरक्षण भिंतीचे तात्काळ काम पूर्ण करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी किमान २ कोटी रुपयांची वार्षिक निविदा आपत्कालीन परिस्थिती कामाची निविदा म्हणून करावी म्हणजे कंत्राटदाराला तात्काळ संरक्षण भिंत बांधता येईल अशी मागणी करणारे निवेदन दिनांक १४ सप्टेंबर, २०१५ रोजी मा.पालकमंत्री यांच्या उपस्थितीत झालेल्या डीपीडीसीच्या आढावा बैठकीत देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने दरवर्षी आपत्कालीन परिस्थिती लक्षात घेऊन रुपये २ कोटीची ई-निविदा काढण्याबाबत आतापर्यंत काय निर्णयात्मक कार्यवाही करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२०-०५-२०१६) :**(१) नाही.

सन २०१५-१६ मध्ये जिल्हा वार्षिक नियोजनांतर्गत मुंबई उपनगर जिल्हासाठी संरक्षण भिंत बांधण्यासाठी एकूण रु. ५४.७५ कोटी इतका आर्थिक तरतुद करण्यात आली आहे. (२) होय.

(३) लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने रु. १.०५ कोटी इतक्या रक्कमेचा संरक्षण भिंतीच्या प्रस्तावाला प्रशासकीय मंजूरी देण्यात आली असून ई-निविदाची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कल्याण, डोंबिवली आणि बदलापूर शहरासाठी एनएमएमटी व्यवस्थापनाने सुरु केलेल्या बससेवा तोट्यात सुरु असल्याबाबत**

**(३२) ३१३१२ (२१-०१-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे-बेलापूर औद्योगिक पट्टा आणि कोकण भवन येथील शासकीय कार्यालयात येणाऱ्या डोंबिवली आणि बदलापूरकरांसाठी एनएमएमटी व्यवस्थापनाने कल्याण, डोंबिवली आणि बदलापूर शहरासाठी वेगवेगळया मार्गावर बसफेऱ्या सुरु केल्या, परंतु सदरील बससेवा तोट्यात सुरु असल्याने ५० टक्के बसफेऱ्यांमध्ये कपात करण्यात आल्याचे दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अपुऱ्या बस फेरीमुळे प्रवाशांची गर्दी वाढत आहे, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करणार आहे,
(३) नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०५-२०१६) :**(१) हे खरे नाही.
सद्य:स्थितीत नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाकडून कल्याण, डोंबिवली आणि बदलापूर शहरांसाठी एकूण ६ बस मार्गावर ४० बसेसच्या १८४ फेऱ्यांद्वारे दैनंदिन बससेवा देण्यात येत आहे. यामार्गावर सुरु असलेल्या बस सेवेमुळे महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमास तोटा होत असला तरी बसेस किंवा बस फेऱ्यांमध्ये कपात करण्यात आलेली नाही.
(२) कल्याण-डोंबिवली व बदलापूर विभागात नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाकडून देण्यात येणाऱ्या बससेवेवर परिवहन उपक्रमास सरासरी प्रति किलोमिटर रु. २५ ते रु. २७ एवढा तोटा सहन करुन बससेवा देण्यात येत आहे.
कल्याण, डोंबिवली आणि बदलापूर विभागात वेगवेगळ्या मार्गावर बससेवा चालू ठेवत असताना, नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमास तोटा सहन करावा लागत असला तरी या मार्गावर चालविण्यात येणाऱ्या बसेस तसेच बसफेऱ्यांमध्ये कपात करण्यात आली नसल्याचे आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे येथील रुबी हॉस्पिटल, सह्याद्री हॉस्पिटल (कर्वे रस्ता) आणि औंधमधील एम्स हॉस्पिटलमध्ये वर्षभरात १० हजार ऐवजी ५५ रुग्णांनीच मोफत उपचार घेतल्याबाबत**

**(३३) ३३२६० (२१-०१-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील रुबी हॉस्पिटल, सह्याद्री हॉस्पिटल (कर्वे रस्ता) आणि औंधमधील एम्स हॉस्पिटलमध्ये वर्षभरात १० हजार ऐवजी ५५ रुग्णांनीच मोफत उपचार घेतल्याचे माहे ऑक्टोबर महिन्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जादा एफएसआय मिळाल्यामुळे रुबी हॉस्पिटलमध्ये १२, सह्याद्री हॉस्पिटलमध्ये पाच तर एम्स हॉस्पिटलमध्ये १० असे एकूण २७ बेड गरीब रुग्णांसाठी राखीव ठेवणे त्यांच्यावर बंधनकारक असल्याचे ही खरे आहे काय,

(३) महापालिका प्रशासनाकडून नागरिकांना या सुविधेची माहितीच दिली जात नसल्यामुळे खासगी हॉस्पिटलचा फायदा होत नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाकडून कुठली कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०५-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.

रुबी हॉल क्लिनिक, सहयाद्री स्पेशालिटी हॉस्पिटल (कर्वे रस्ता) आणि औंध इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस या तिनही प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये दिनांक १.४.२०१५ ते दिनांक ३१.१०.२०१५ अखरे एकूण ७४ रुग्णांनी फ्रि बेड अंतर्गत आरोग्य कार्यालयाकडून संबंधित हॉस्पिटल्ससाठी मोफत उपचार घेतले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

महानगरपालिका प्रशासनाकडून विविध प्रकारे पुणे शहरातील गरीब व गरजू नागरीकांना या सुविधेची माहिती दिली जाते.

(४) महापालिका प्रशासनाकडील आरोग्य विभागाकडून पुणे शहरातील जास्तीत जास्त गरीब व गरजू रुग्णांना संबंधित प्रायव्हेट हॉस्पिटल्समध्ये फ्रि बेड सुविधेअंतर्गत मोफत उपचारांबाबत माहिती मिळावी, यासाठी संबंधित माहिती फलक शहरातील खाली नमूद केलेल्या ठिकाणी दर्शनी भागात लावण्यात आलेले आहेत.

१) पुणे महानगरपालिका मुख्य इमारत शिवाजीनगर, आरोग्य मध्यवर्ती कार्यालय-१ माहिती फलक

२) पुणे महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालये- १५ माहिती फलक

३) पुणे महापालिका दवाखाने - बाह्यरुग्ण विभाग - ११ माहिती फलक

४) पुणे महापालिका दवाखाने - आंर्तरुर्ग्ण विभाग - ११५ माहिती फलक

५) रुबी हॉल क्लिनिक (स्टेशन रोड)- १ माहिती फलक

६) सहयाद्री स्पेशालिटी हॉस्पिटल (कर्वे रस्ता) - १ माहिती फलक

७) औंध इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस (एम्स) हॉस्पिटल (औंध गाव) - १ माहिती फलक

८) साधु वासवानी मिशन, के.के. आय इन्स्टिट्युट, (कोरेगाव पार्क) - १ माहिती फलक

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नंदुरबार जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार युवकांना त्यांच्या पात्रतेनुसार अनुदान वा बीजभांडवल लाभ प्रत्यार्पित करण्याबाबत

**(३४) ३३२८४ (२१-०१-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उत्तर महाराष्ट्रातील नंदुरबार जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार युवकांना त्यांच्या पात्रतेनुसार रोजगार व स्वयंरोजगार प्रतिलाभार्थी दहा लक्ष रुपयांचे अनुदान वा बीजभांडवल लाभ प्रत्यार्पित करण्याबाबतची मागणी उत्तर समाजवादी पक्ष (नंदुरबार जिल्हा) तसेच जनप्रतिनिधी, सुशिक्षित बेरोजगार संघटना यांच्यावतीने मा.मुख्यमंत्री (कौशल्य विकास आणि उदयोजकता), राज्यमंत्री (कौशल्य विकास आणि उदयोजकता) प्रधान सचिव (कौशल्य विकास आणि उदयोजकता), विभागीय जिल्हा अधिकारी (कौशल्य विकास आणि उदयोजकता), आणि जिल्हाधिकारी (कौशल्य विकास आणि उदयोजकता), नंदुरबार यांना दिनांक १६ ऑक्टोंबर २०१५ वा त्या सुमारास लेखीनिवेदनाद्वारे सादर केले आहे, खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशीअंती कोणती निर्णायक ठोस कार्यवाही वा उपाययोजना तातडीने कार्यान्वित केली वा करण्याचे प्रस्तावित केले आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०४-२०१६) :**(१) हे खरे नाही.

समाजवादी पार्टी, नंदुरबार यांचे दि.१६.१०.२०१५ चे निवेदन शासनास प्राप्त झाले असून त्यामध्ये नंदुरबार जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार मुला-मुलींना शासकीय नोकरी द्यावी अथवा रोजगार करण्यासाठी दहा लाख रुपये अनुदान द्यावे अशी मागणी करण्यात आली आहे.

(२) राज्यातील बेरोजगार युवकांना रोजगार प्राप्त व्हावा, या अनुषंगाने प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान राबविण्यात येत आहे. ज्याद्वारे बेरोजगार युवकांना कौशल्य विषयक प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील मालाड पूर्व पिंपरीपाडा येथील झोपडपट्टीला गलिच्छ वस्ती जाहिर करण्याबाबत

**(३५) ३३६३२ (२१-०१-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगर दिंडोशी विधानसभा क्षेत्रातील मालाड पूर्व पिंपरीपाडा येथील सर्वे क्र.२६९ हिस्सा नं. १ ते ७ सीटीएस क्र. ६९३ ते ६९७ मधील भूखंडावरील झोपडीधारकांना मुलभुत नागरी सुविधा उपलब्ध करण्याकरिता सदरहू भूखंड गलिच्छ वस्ती घोषित करणेबाबची मागणी स्थानिक लोक्रप्रतिनिधीनी मा. गृहनिर्माण मंत्री, मा. पालकमंत्री, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना दिनांक १७ ऑगस्ट, २०१५ रोजी दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे केली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने उक्त भूखंड गलिच्छ वस्ती घोषित करणेबाबत या प्रकरणी शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे व याबाबत सद्य:स्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२०-०५-२०१६) :**(१) होय.
(२) स्थानिक रहिवाशी यांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने मालाड पूर्व पिंपरीपाडा येथील सर्वे क्र. २६९ हिस्सा नं. १ ते ७ सीटीएस क्र. ६९३ ते ६९७ मधील भूखंडावर कलम ४(१) अन्वये गलिच्छ वस्ती घोषित करण्याबाबतची आवश्यकती कार्यवाही उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) तथा सक्षम प्राधिकारी, मालाड यांच्याकडून गुणवत्तेवर करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई उपनगर मालाड (पूर्व) कुरार, गांव, तानाजी नगर, मानडोंगरी आणि सिताबाई चाळ येथे संरक्षण भिंत बांधणेबाबत

**(३६) ३३६३८ (२१-०१-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगर मालाड पूर्व कुरार, गांव, तानाजी नगर, मानडोंगरी आणि सिताबाई चाळ येथील दिनांक २० जून, २०१५ रोजी कोसळलेली संरक्षण भिंत, रहिवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने बांधणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.गृहनिर्माण मंत्री यांना दिनांक १७ ऑगस्ट, २०१५ रोजी लेखी निवेदन दिले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने अद्याप शासनातर्फे विशेष निधी उपलब्ध करुन संरक्षण भिंतीचे काम तातडीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,
(३) अद्याप, शासनाने याबाबत कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२०-०५-२०१६) :**(१) होय.
(२) सदर कामास जिल्हा नियोजन समितीची प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून या कामाची ई-निविदा काढण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ब्रम्हपूरी (जि.चंद्रपूर) नगरपरिषदे व दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत दलित वस्तीमध्ये विकास कामे मंजूर करण्याबाबत**

**(३७) ३६०२७ (२१-०१-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी नगरपरिषदे दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत दलित वस्तीमध्ये विकास कामे मंजूर न करता आदेश क्र कार्या१०/नविशा/अ.का./प्र.शा./कावि २०१५/६०६ नुसार दिनांक १९ मे २०१५ च्या आदेशान्वये जिल्हाधिकारी,चंद्रपूर यांनी विविध विकास कामे मंजूर केली असल्याची माहिती लोकप्रतिनिधींना प्राप्त होताच या प्रकरणी लेखी निवेदन दिंनाक ०९/०७/२०१५ रोजी  जिल्हाधिकारी चंद्रपूर यांना दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाची दखल घेवून या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे चौकशीअंती शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०४-२०१६) :**(१) प्रश्नाधीन निवेदन जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना प्राप्त झाले आहे.

(२) सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्याकडून चौकशी सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील मेट्रो-३ या महत्वाकांक्षी प्रकल्पाच्या बांधकामासाठी लागणारी जमिन संपादित करण्याबाबत**

**(३८) ३६४०६ (२१-०१-२०१४). श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मेट्रो-३ या महत्वाकांक्षी प्रकल्पाच्या बांधकामासाठी लागणा-या जमिनीपैकी एकूण किती टक्के जमिन संपादित करण्यात आली आहे,

(२) असल्यास, सदर संपादित जमिन हस्तांतरीत करण्याकरिता किती कालावधी लागणार आहे,

(३) असल्यास, सदर लागणाऱ्या कालावधीमुळे प्रकल्पाचीही किंमत वाढत असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासन कोणत्या उपाययोजना करणार आहे वा करित आहे,

(५) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०४-२०१६) :**(१), (२), (३), (४) व (५) मुंबई मेट्रो-३ प्रकल्पासाठी एकुण ७५.२२ हेक्टर शासकीय जमिनीची कायस्वरुपी आवश्यकता आहे.

सदर प्रकल्पासाठी एकुण ३.४५ हेक्टर खाजगी जमिनीची आवश्यक असुन, त्यापैकी ०.५० हेक्टर जागा कायमस्वरुपी लागणार असुन उर्वरीत २.७५ हेक्टर जागा तात्पुरत्या स्वरुपात लागणार आहे. तथापि, अद्याप कोणतीही खाजगी जमिन संपादित करण्यात आलेली नाही.

सदर खाजगी जमिन संपादन करीत जमिन धारका (मालका) सोबत वाटाघाटीद्वारे जमिन ताब्यात घेण्याकामी M.R.& T.P. Act १९६६ कायदा, कलम १२६, I (a) & (b) अन्वये नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. जमिन धारकासोबत प्राथमिक चर्चा करुन त्यांना प्रकल्पाचे महत्व समजाविण्याकरीता तसेच नुकसान भरपाई बाबत माहिती देण्यासाठी प्राथमिक सुनावणी समिती (Preliminary Hearing Committees) गठीत करण्यात आल्या असून सदर समिती मार्फत जमिन धारकासोबत वाटाघाटीद्वारे जमिन ताब्यात घेण्याकरीता सुनावणीची प्रक्रिया प्रगतीत आहे.

महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक संक्रीर्ण/०३/२०१५/प्र.क्र.३४/ अ-२, दिनांक १२ मे २०१५ व दिनांक ३०/०९/२०१५ नुसार खाजगी क्षेत्रातील जमिन प्रकल्पासाठी खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने घेण्याबाबत शासन निर्णयानुसार जमिन धारकांना योग्य मोबदला देणेकरीता मोबदला समिती (Compensation Committee) गठीत करण्यात आलेली आहे. तसेच वाटाघाटीद्वारे जमिन मालकांनी नुसान भरपाई न स्वीकारल्यास भूसंपादनाची कारवाई करण्याचे नियोजित आहे.

---

**मुंबई अंधेरी येथील स्काय गुरमेट प्लाइटकिचन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या शाखेत वायू गळती होऊन २४ जणांना विषबाधा झाल्याबाबत**

**(३९) ३६४७४ (२१-०१-२०१६). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई अंधेरी येथील स्काय गुरमेट प्लाइटकिचन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या शाखेत वायू गळती होऊन २४ जणांना विषबाधा झाल्याची घटना माहे ऑगस्ट, २०१५ वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय ,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार वायुगळती बाबत सदर कंपनी प्रशासनावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच विषबाधितांना कोणती वैद्यकीय व आर्थिक मदत करण्यात आली,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०२-०५-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

दिनांक ११.०८.२०१५ रोजी स्काय गुरमेट कॅटरींग प्रा.लि. (ऑफ इंटरनॅशनल एअरपोर्ट, अंधेरी, मुंबई) या कारखान्यात बॉयलर रुममधमन वायुगळती होऊन ३२ कामगार बाधित झाले, हे खरे आहे.

(२) होय, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे.

(३) या प्रकरणी केलेल्या चौकशीत असे आढळून आले की, सदर कारखान्यात दि.११.०८.२०१५ रोजी दुपारी ३.०० वा. च्या दरम्यान बॉयलर हाऊसमधील बॉयलर-२ च्या Exhaust duct च्या flange मधून कार्बन डाय ऑक्साईड ($CO_2$) वायुची गळती होऊन बॉयलर हाऊसच्या बाजूला असलेल्या कॅन्टीन व क्लोक रुममधील कामगारांना (महिला व पुरुष) वायुगळतीच्या वासामुळे डोळे जळजळणे, डोके दुखणे, इत्यादी त्रास सुरु झाला. औधधोपचारानंतर सर्व कामगार कामावर रुजू झाले आहेत.

व्यवस्थापनाने सर्व बाधित कामगारांच्या वैद्यकीय उपचारासाठी एकूण रु.३,५३,५०६/- इतका खर्च केलेला असून उपचारादरम्यान वैद्यकीय रजेचे वेतन दिलेले आहे.

कारखाना व्यवस्थापनाने बॉयलर डक्टची योग्य प्रकारे देखभाल न केल्यामुळे कारखान्याच्या भोगवटादाराविरुध्द कारखाने अधिनियम, १९४८ च्या कलम ७ (अ) २ (अ) च्या भंगाबाबत महानगर न्यायदंडाधिकारी, अंधेरी, मुंबई यांच्या न्यायालयात खटला क्र.२२०६५८५/एसएस/२०१५ दाखल केलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगाव महापालिकेत सफाई कर्मचाऱ्यांची ५८५ मंजूर पदे भरण्याबाबत

**(४०) ३६७३३ (२१-०१-२०१६). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव महापालिकेत सफाई कर्मचाऱ्यांची ५८५ मंजूर पदे अनेक वर्षापासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदांवर कर्मचाऱ्यांची भरती न करता खासगी मक्तेदारांकडून काम करवून घेण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अखिल भारतीय सफाई मजदूर संघातर्फे राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडे याबाबत तक्रार दाखल करुन दाद मागण्यात आली, आयोगाने त्यावर महापालिकेला एक महिन्यांच्या आत सफाई कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याचे आदेश दिले असल्याचे माहे मार्च, २०१५ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०४-२०१६) :**(१) संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई यांच्या दिनांक २२.०१.१९९७ च्या आदेशान्वये, सफाई कामगारांची ५८५ पदे मंजूर करण्यात आली होती. त्यापैकी ६२ पदे भरण्यात आली होती. तथापि, उर्वरीत ५२३ पदे विहीत मुदतीत न भरल्याने, व्यपगत झाली आहेत.

(२) जळगाव महानगरपालिकेचा आस्थापना खर्च, हा विहीत मर्यादेपेक्षा (३५%) जास्त असल्याने, पदे भरणे शक्य होत नाही. त्यामुळे, काही क्षेत्रात खाजगी मक्तेदाराकडून काम करुन घेण्यात येते.

(३) व (४) राष्ट्रीय मानवाधिकर आयोगाकडे अखिल भारतीय सफाई मजदूर संघाने सफाई कम्रचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत दाद मागितली असली तरी, मा.आयोगाने असे कुठलेही आदेश दिलेले नाहीत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील झोपडपट्यातील विकास कामासाठी निधीबाबत**

**(४१) ३६८८० (२१-०१-२०१६). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील झोपडपट्यातील विकास कामासाठी सन २०१४-१५ या वर्षासाठी रु.४५ कोटीचा विकास कामे करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील कोणकोणत्या भागातील झोपडपट्यांचा समावेश या योजनेत करण्यात येणार आहे, तसेच विकास कामांमध्ये कोणकोणत्या कामाचा समावेश करण्यात आला आहे,
(३) असल्यास, आतापर्यंत कोणकोणत्या झोपडपट्टीचे विकास आराखडे व नकाशे तयार करण्यात आले आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२०-०५-२०१६) :**(१) मुंबईतील झोपडपट्टी विकास कामासाठी सन २०१५-१६ मध्ये रु. ४५.०० कोटी म्हाडा प्राधिकरणास उपलब्ध करुन दिले आहेत.
(२) या निधी मधून मुंबई जिल्हा व मुंबई उपनगर जिल्ह्यातील एकूण ३६ मतदार संघातील झोपडपट्ट्यांमध्ये मतदारसंघनिहाय विकासाच्या कामांचा समावेश करण्यात आला आहे.
(३) सदर निधीमधून मुलभूत सुविधा पुरविण्याच्या कामांचे प्रयोजन असल्याने विकास आराखडे व नकाशे तयार करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील मेट्रो - ३ च्या कारशेडकरिता गोरेगाव येथील आरेतील जागेचा वापर करण्यात येणार असल्याबाबत**

**(४२) ३७११२ (२१-०१-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील मेट्रो-३ च्या कारशेडकरिता मुंबई उपनगरातील गोरेगाव येथील आरेतील जागेचा वापर करण्यात येणार आहे असे मा. मुख्यमंत्री यांनी माहे ऑक्टोबर, २०१५ च्या सुमारास स्पष्ट केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरे कॉलनीतील जागेचा वापर करण्यास पर्यावरणवादी संघटनांनी तीव्र विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच बीकेसीच्या मोकळ्या भूखंडावर एकही झाड नसल्याने या ठिकाणी व मुंबईतील इतर नऊ ठिकाणांचा पर्याय या संघटनांनी राज्य शासनास दिला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या पर्यायासंदर्भात शासनाने विचार केला आहे काय, असल्यास त्यांचे स्वरुप काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०४-२०१६) :**(१), (२), (३) व (४) मुंबई मेट्रो रेल लाईन-३ प्रकल्पाच्या कार डेपोच्या जागेतील प्रस्तावित बाधीत झाडांप्रकरणी स्थानिक नागरीक, बिगर शासकीय संस्था, राजकीय पक्ष यांनी केलेला विरोध व आंदोलने यांचा विचार करुन दिनांक ११ मार्च २०१५ रोजीच्या अध्यादेशान्वये आरे कॉलनी येथील कार डेपो प्रकरणी तज्ञ समिती स्थापन केलेली होती.

सदर समितीने कार डेपो प्रकरणी वेगवेगळ्या विषयांचा विस्तृत अभ्यास करुन कार डेपोमुळे सद्यस्थितीतील पर्यावरणाचा कमीत कमी ऱ्हास होईल याकरिता काय उपाययोजना कराव्यात यांचाही अभ्यास केलेला आहे. तसेच सदर तज्ञ समितीने पर्यावरणवादी संघटनांनी व नागरीकांनी सुचित केलेल्या व मार्गीकेच्या लगत उपलब्ध असलेल्या ९ वेगवेगळ्या ठिकाणच्या मोकळ्या जागांचा सविस्तर अभ्यास करुन समितीने त्याचा शिफारस अहवाल दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजी सादर केला आहे.

सदर अहवाल स्विकारुन दिनांक १६ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या पत्रान्वये मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांना पुढील कार्यवाही करणेबाबत आदेश दिले आहेत.

---

## वाळुज (ता.गंगापुर, जि.औरंगाबाद) औद्यौगिक क्षेत्रात सुरक्षा साधनांअभावी कामगारांचे जीव धोक्यात आल्याबाबत

**(४३) ३८२८५ (२१-०१-२०१६). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाळुज (ता.गंगापुर, जि.औरंगाबाद) औद्योगिक क्षेत्रात बहुतांश कंपन्यामध्ये सुरक्षा साधने वापरविना पडली आहेत व याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे हजारो कामगारांना जीव धोक्यात घालुन काम करावे लागते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनेक कंपन्यांमध्ये सुरक्षेची साधने नुसती वापरविना पडून आहेत तसेच बऱ्याच कंपन्यांमध्ये सुरक्षा साधनांचा अभाव आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, यापुर्वी व आता देखील अनेक भीषण दुर्घटनांमध्ये अनेक कामगारांना आपला जीव गमवावा लागला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने कामगारांच्या सुरक्षेविषयी हलगर्जीपणा करणाऱ्या कंपन्यांवर कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०६-०५-२०१६) :**(१) वाळूज औद्योगिक क्षेत्रात बहुतांश कारखान्यांमध्ये वैयक्तिक सुरक्षा साधने ही वापराविना पडून राहिलेली नाहीत. त्याचा वापर होत आहे. बहुतांश कारखान्यांमध्ये आवश्यक त्या ठिकाणी वैयक्तिक सुरक्षा साधने दिलेली आहेत.
(२) वाळुज (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) औद्योगिक क्षेत्रात बहुतांश कारखान्यांमध्ये योग्य त्या ठिकाणी वैयक्तिक सुरक्षा साधने दिलेली आहेत व त्यांचा वापर कामगार करीत आहेत. वाळुज औद्योगिक क्षेत्रात वैयक्तिक सुरक्षा साधना अभावी अपघात झालेले नाहीत. अपघाताची कारणे ही वेगवेगळी आहेत.
(३) हे खरे नाही. वैयक्तिक सुरक्षा साधना अभावी कामगारांना जीव गमवावा लागलेला नाही.
(४) ज्या कारखान्यांमध्ये प्राणघातक, गंभीर अपघात होतात, सुरक्षा विषयक हलगर्जीपणा व त्रुटी आढळून येतात, अशा प्रकारणांची या संचालनालयामार्फत चौकशी करण्यात येते व आवश्यक त्या ठिकाणी कायदेशीर कारवाई करण्यात येते.
(५) अपघाताच्या चौकशीमध्ये विलंब होत नाही.

---

## जिंतूर नगरपरिषदतर्फे (जि.परभणी) शहराला पाणी पुरवठा करण्याकरीता नविन पाण्याच्या टाकीचे बांधकाम केल्याबाबत

**(४४) ३८३९५ (२१-०१-२०१६). श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिंतूर नगरपरिषदतर्फे (जि.परभणी) शहराला पाणी पुरवठा करण्याकरीता नविन पाण्याच्या टाकीचे बांधकाम केलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या नविन टाकीतून पाण्याची गळती होवून रोज लाखो लिटर पाणी वाया जाते याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये जिल्हाधिकारी परभणी यांचेकडे तक्रार केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यास जबाबदार असलेल्या दोषींविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०४-२०१६) :**(१) होय.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहरातील मेट्रो रेल्वे प्रकल्पामुळे ना-दुरुस्त वर्सोवा ते घाटकोपर रस्ता दुरुस्त करुन मिळणेबाबत

**(४५) ३८६६५ (२१-०१-२०१६). श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील प्रथम मेट्रो रेल्वे प्रकल्प वर्सोवा ते घाटकोपर सुरु करण्याकरिता मुंबई महानगरपालिकेचा मुख्य रस्ता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने ताब्यात घेऊन सदर रस्ता अत्यंत ना-दुरुस्त व अपूर्ण स्थितीमध्ये मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्यांच्या डागडूजी व दुरुस्तीकरीता मेसर्स, मुंबई मेट्रो प्रा.लि. व महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून कत्रांटदार नियुक्त करुन कोट्यावधी रुपये खर्च करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्ता ना-दुरुस्त अवस्थेतच महानगरपालिकेस हस्तांतरीत झाल्यानंतर स्थानिक लोकप्रतिनिधींनी तारांकित प्रश्नामार्फत यात विचारणा केली असता संबंधित एम.एम.आर.डी.ए. व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी शासनाची पर्यायाने विधीमंडळाची दिशाभूल केली असल्यामुळे त्या अधिकाऱ्यासमवेत पाहणी करण्याबाबत आदेश द्यावेत अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री महोदयांना पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०४-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.
(२), (३), (४) व (५) सदर रस्त्याच्या हस्तांतरणाबाबत माहे जानेवारी ते मार्च, २०१५ या कालावधीत सदर रस्त्याची संयुक्तिक पाहणी करण्यात आली होती. रस्त्यांची किरकोळ दुरुस्तीची कामे मुंबई महानगरपालिकेमार्फत करावी व सदर किरकोळ दुरुस्त्यांसाठी लागणारा निधी आवश्यकता असल्यास प्राधिकरणामार्फत उपलब्ध करुन देण्यात येईल असे ठरले.

सदर रस्ता हा मुंबई महानगरपालिकेस माहे मे, २०१५ मध्ये हस्तांतरीत करण्यात आला आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत आजपर्यंत रु.५० कोटी इतका निधी रस्त्याच्या दुरुस्तीसाठी महानगर पालिकेच्या मागणीनुसार उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

---

**नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये वाणिज्य-रहिवाशी वापराच्या इमारती समोरील जागेत विक्रीचे साहित्य ठेवल्याबाबत**

**(४६) ३८७५२ (२१-०१-२०१६). श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये वाणिज्य-रहिवाशी वापराच्या इमारती समोरील जागेत विक्रीचे साहित्य ठेवल्याबाबत नवी मुंबई महानगरपालिकामार्फत सन २००३-२००७ या कालावधीमध्ये परवानगी देण्यात येत होती परंतु त्यानंतर सदरहू परवानगी देणे बंद केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवी मुंबईत सुमारे ७० हजार दुकाने व साडेतीन हजार छोटी हॉटेल्स असून हे दुकानदार व हॉटेल व्यवसायिक बिल्डींगमधील मार्जिनल स्पेसचा वापर आपल्या व्यवसायासाठी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) सदरहू मार्जिनल स्पेसचा वापर हा विनापरवाना असल्याने त्यावर वारंवार कारवाई होत असते, त्यामुळे दुकानदार व हॉटेल्स व्यावसायिकांचे नुकसान होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत नवी मुंबई महानगरपालिका आयुक्तांकडे हॉटेल व्यावसायिकांची बैठक होऊन यामध्ये तोडगा काढण्याची व मुंबई महानगरपालिका प्रमाणे कार्यवाही करण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधींनी (बेलापूर) आयुक्तांना केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५)असल्यास, मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील व्यावसायिकांना इमारती व दुकानासमोरील जागा वापराबाबत अद्यापही निर्णय न घेण्याची कारणे काय,
(६) असल्यास, तातडीने याबाबत निर्णय घेवून जागा वापराची परवानगी देण्याबाबत शासनाची भूमिका कायआहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०५-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) व्यवसायासाठी काही प्रमाणात मार्जिनल स्पेसचा वापर होतो, हे खरे आहे.
(३) सदरहू मार्जिनल स्पेसचा वापर विनापरवाना / अनधिकृत असल्याने त्याविरोधात महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील संबंधित तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात येते.
(४) होय.
(५) व (६) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये खानपानासाठी परवानगी देण्यात आलेल्या वापरामध्ये तात्पुरत्या स्वरुपात लगतच्या जागेमध्ये सेवा क्षेत्र तात्पुरते अनुज्ञेय करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचनांचा आढावा घेण्यासाठी व अनुषंगिक बाबींचा अभ्यास करण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेने अतिरिक्त आयुक्त (सेवा), नवी मुंबई महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे.

या समितीने आपला अहवाल सादर केल्यानंतर याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचे प्रस्तावित असल्याचे आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी कळविले आहे.

---

## मुंबईतील मेट्रो ट्रेनमध्ये विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि अंध-अपंगांना तिकिट दरात सवलत मिळणेबाबत

**(४७) ३८७७२ (२१-०१-२०१६). श्री.रणजित कांबळे (देवळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई व मुंबई उपनगरात बेस्ट, लोकलमध्ये विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि अंध-अपंगांना तिकिट दरात सवलत दिली जाते परंतु मेट्रो मध्ये अशी कोणत्याही प्रकारची सवलत देण्यात येत नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कारणास्तव या प्रवाशांची गैरसोय होत असल्याने वर्सोवा ते घाटकोपर मेट्रो तिकिटांचा तिढा सोडविण्यासाठी न्यायालयाच्या आदेशानुसार दर निश्चित समितीची

नेमणूक केली असून या मध्ये या सवलती संदर्भात शिफारशी करण्यात आल्या आहेत हे पाहता संबंधित मेट्रो प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०४-२०१६) :**(१) जे विद्यार्थी १२ वर्षाखालील असतील त्यांना शनिवार व रविवार या दोन दिवशी तिकिटाचे दर फक्त रु.१०/- आकारले जातात.
(२) व (३) दर निश्चिती समितीने दिनांक ८ जुलै, २०१५ रोजी मेट्रो रेल प्रशासनाला (MRA) म्हणजेच मुंबई मेट्रो वन प्रा.लि. (MMOPL) यांना आपला अहवाल सादर केला. या अहवालात सवलतीबाबत कुठेही उल्लेख दिसून येत नाही. तद् नंतर सदर अहवालास शासनातर्फे उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले असून प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे.

---

**राज्यातील दगड खाण कामगारांसाठी कल्याणकारी योजना राबविण्याबाबत**

**(४८) ३९००६ (२१-०१-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सुमारे २७ हजार दगड खाणी असून ८५ लाख कामगारांची शासनाकडे नोंदी असून दगड खाणीच्या माध्यमातून शासनाला वर्षाला करोडो रुपयांचा महसूल मिळवून देणारा खाण कामगार, देशाला स्वातंत्र मिळून ६८ वर्षे होऊनही अन्न व वस्त्र निवारा या सारख्या मूलभूत गरजापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले आहे,
(३) असल्यास, त्यानुसार दगडखाण कामगारांच्या कल्याणाच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२६-०५-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) केंद्र शासनाने असंघटीत कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम, २००८ पारित केलेला असून दगडखाण कामगारांना असंघटीत कामगार या संज्ञेत समावेश होतो. असंघटीत कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम, २००८ च्या कलम- १४ अन्वये महाराष्ट्र शासनाने दि. ३०.५.२०१३ रोजीच्या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा नियम, २०१३ पारित केलेला आहे. उक्त अधिनियमाच्या कलम ६(१) अन्वये असंघटीत कामगारांसाठी राज्यस्तरीय कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याबाबत कार्यवाही शासनस्तरावर चालू आहे. सदर मंडळ स्थापन झाल्यावर त्यामार्फत असंघटीत कामगारांसाठीच्या (ज्यामध्ये दगडखाण कामगारांचाही समावेश असेल) विविध कल्याणकारी योजना राबविणे शक्य होईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## देशातील प्रत्येक जिल्ह्यात कौशल्य विकास केंद्र निर्मितीबाबत

**(४९) ४४५७० (०७-०५-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने देशातील युवकांमध्ये कौशल्य विकास घडविण्यासाठी खासगी क्षेत्राच्या मदतीने राष्ट्रीय कौशल्य विकास मोहिमे अंतर्गत देशातील प्रत्येक जिल्ह्यात कौशल्य विकास केंद्राची उभारणी करण्याच्या निर्णयाच्या अनुषंगाने प्रत्येक जिल्ह्यात सदर केंद्रे उभारण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी केंद्र शासनाकडून शासनाला आर्थिक मदतीसहित कोणकोणत्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत,

(३) असल्यास, शासनाने कौशल्य विकास केंद्र निर्मितीसाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत, तसेच कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०६-२०१६) :**(१) महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात राष्ट्रीय कौशल्य विकास मोहिमेअंतर्गत खाजगी क्षेत्राच्या मदतीने कौशल्य विकास केंद्र उभारण्याबाबत केंद्र सरकारकडून कोणतेही निर्देश प्राप्त झालेले नाहीत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मराठवाडा मुक्ती संग्राम लढयामध्ये भाग घेतलेल्यांना स्वातंत्र सैनिक गौरव पेन्शन मिळण्याबाबत

**(५०) ५०५४३ (१६-०५-२०१६). श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा मुक्ती संग्राम लढयामध्ये १३ महिने भूमीगत राहून निजामाशी ५० जणांनी लढा दिला होता, कॅम्प प्रमुखाच्या सुचनेनुसार मराठवाडा मुक्ती संग्राम लढयात काम केलेल्याची सर्वांची स्वातंत्रसैनिक गौरव पेन्शनची प्रकरणे गेल्या ३० वर्षापासून शासनाकडे निर्णयाअभावी प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा गौरव समिती उच्चाधिकारी समिती, मंत्रालय, मुंबई यांनी दोन वेळा मंजूरीची शिफारस केली होती, मा.राज्यमंत्री महोदय यांनी मंजूरीची शिफारस केलेली व तत्कालीन प्रधान सचिव, श्रीकांत देशपांडे यांनी सखोल अभ्यास करून मंजूरीची शिफारस केलेली सर्व प्रकरणे तात्काळ मंजूर करून निकाली काढावी आदी मागण्यांसाठी स्वातंत्रसैनिक डॉ. उत्तम सोनकांबळे यांच्या अध्यक्षतेखाली मराठवाडा मुक्ती संग्राम लढयातील

मराठवाडयाच्या ५० स्वातंत्रसैनिकांचे पेन्शनासाठी आझाद मैदान, मुंबई येथे माहे जानेवारी २०१६ पासून आमरण उपोषण सुरू केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मराठवाडयातील मराठवाडा मुक्ती संग्राम लढयामध्ये १३ महिने भूमीगत राहून निजामाशी लढा दिलेल्या सदरहू २५ स्वातंत्रसैनिकांना पेन्शन मंजूर करण्यास शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०६-२०१६) :**(१) व (२) स्वातंत्र्यसैनिकांची पेन्शनची प्रकरणे गत ३० वर्षापासून शासनाकडे निर्णयाअभावी प्रलंबित आहेत, हे खरे नाही.

शासन निर्णय दि.०४.०७.१९९५ नुसार (अ) तुरुंगवास झालेले स्वातंत्र्य सैनिक,(आ) पकड वॉरंट निघाल्यामुळे फरारी राहिलेले स्वातंत्र्य सैनिक, (इ) भूमिगत स्वातंत्र्य सैनिक आणि (ई) गोवा मुक्ती संग्रामात सहभागी झालेले स्वातंत्र्य सैनिक यांनी निवृत्तीवेतन मिळण्यासाठी कोणते पुरावे सादर करणे आवश्यक आहे, हे विहित करण्यात आलेले आहे. या शासन निर्णयातील निकषाची पूर्तता ज्या अर्जदारांच्या बाबतीत होत नाही, अशा अर्जदारांचे अर्ज नामंजूर करण्यात आलेले आहेत. असे अर्जदार शासनाकडे पुन्हा पुन्हा अर्ज करीत आहेत, आंदोलन/उपोषण अशा मार्गांचा अवलंब करुन शासनाकडे वेगवेगळ्या स्वरुपाच्या मागण्या करीत आहेत. अशा अर्जदारांपैकी काही अर्जदारांनी जानेवारी २०१६ मध्ये उपोषण केले होते.
(३) व (४) उपोषणकर्त्या अर्जदारांनी शासनास सादर केलेली निवेदने विचारात घेवून त्यावर निर्णय घेण्याची प्रक्रिया शासन स्तरावर सुरु आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.